
ISBN : 978-93-85218-02-6

"Propagation of Education for Knowledge Science and Values."
- Dr. Bapuji Salunkhe.



Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# Samajbhushan Ganpatrao Kalbhor Arts, Commerce & Science College, Lonikalbhor, Pune

Dist. PUNE (Maharashtra)
(NAAC Accredited 'B')

*BCUD, SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, PUNE*

State Level Seminar
on

## "19th & 20th Century Social Reform Movements in Maharashtra"

27th & 28th January, 2017.

# SOUVENIR

Chief Editor
Dr. Sunilkumar Kurane
*(Principal)*

Editor
Dr. Ambadas Manjulkar
*(Co-ordinator)*

Organized by - DEPARTMENT OF HISTORY

Scanned with CamScanner

"Propagation of Education for Knowledge Science and Values."
- *Dr. Bapuji Salunkhe.*

*Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's*

**Samajbhushan Ganpatrao Kalbhor Arts,
Commerce & Science College, Lonikalbhor, Pune**

**DEPARTMENT OF HISTORY**

# STATE LEVEL SEMINAR

**on**

# "19th & 20th Century Social Reform Movements in Maharashtra"

**27th & 28th January, 2017**

**Chief Editor**
**DR. SUNILKUMAR KURNE**
**(Principal)**

**Editor**
**DR. AMBADAS MANJULKAR**
**(Co-ordinator)**

**Co-Editor**
**DR. USHA VITKAR**

Sandesh
PUBLICATIONS

Scanned with CamScanner

 ISBN : 978-93-85218-02-6


| Sr.No. | Name of Articles | Authors Name | Page No. |
|---|---|---|---|
| 12. | Lokmanya Tilak's Contribution in Swadeshi Movement | Dr. Raghunath D. Shelke | 67 |
| 13. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांची स्त्री-शिक्षणाविषयी भूमिका | प्रा. हेमंतकुमार डेंगळे | 73 |
| 14. | सामाजिक व धार्मिक सुधारणा : आर्य समाज | प्रा. अरुण सोनकांबळे | 78 |
| 15. | मृणाल गोरे यांचे सामाजिक सुधारणाविषयक कार्य : एक चिंतन | बाराते राजेश मधुकर | 81 |
| 16. | महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनात सत्यशोधक समाजाची भूमिका | भालसिंग अजित लक्ष्मण | 85 |
| 17. | विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक कार्य | दिपाली खोडदे | 88 |
| 18. | "१९ व्या व २० व्या शतकातील सामाजिक सुधारणा चळवळ आणि महिला सबलीकरण" | गाभणे हेमा गजानन | 93 |
| 19. | महात्मा फुले यांचे शेती व समाजविषयक विचार | प्रा.बी.जे.काकडे<br>प्रा.ए.टी.गंडाळ | 99 |
| 20. | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य | प्रा.डॉ. रघुराज मुगुटराव कुरुमकर | 103 |
| 21. | सत्यशोधक समाज चळवळ आणि सामाजिक परिवर्तन | डॉ. मीना चंद्रभान साळे | 106 |
| 22. | नानासाहेब गोरे यांचे समाजसुधारणा कार्यातील योगदान | प्रा. डॉ. मोकाटे नाथा रामभाऊ | 109 |
| 23. | १९ व्या शतकातील सामाजिक चळवळ आणि अस्पृश्यता उध्दाराचे कार्य | प्रा.डॉ. प्रशांत के पाठक<br>प्रा.डॉ. रेखा मनोहर बडोदेकर | 115 |
| 24. | महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील राजर्षी शाहू महाराजांचे योगदान | डॉ.ए.आर.म्हळसने<br>राजाभाऊ श्रीमंतराव इंदलकर | 119 |


Scanned with CamScanner

# महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनात सत्यशोधक समाजाची भूमिका

मालसिंग अजित लक्ष्मण
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

एकोणिसाव्या शतकांतील समाज प्रबोधनाचे नेतृत्व राजाराममोहन राय यांनी केले त्यांच्या समाज प्रबोधनाचा पाया 'मानवीविश्वधर्म' हा होता भारतातील समाज प्रबोधनाचे पहिले पाऊल हे ब्राह्मो समाजाच्या स्थापनेपासून (१८२८) पासून पडले. भारतातील समाजसुधारणेचे मूळ धर्म सुधारणेत आहे. ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज व सत्यशोधकसमाज यांचा तौलनीक अभ्यास केल्यास आपल्याला सामाजिक प्रबोधनाची परंपरा दिसून येते. भारतातील सामाजिक प्रबोधनाला पाश्चात्य शिक्षण, औद्योगीकीकरण यांमुळे चालना मिळाली तत्कालीन कालखंडात फुले-लोखंडे-भालेकर यांनी जनसमाजाचे प्रतिनिधी म्हणून कार्य केले. समाजातील प्रचलित व्यवस्थेला पर्यायी विचाराधारा विकसित करण्याचे त्याचबरोबर कर्तेनेतृत्व देण्याचा प्रयत्न केला. दादोबा पाडुरंग हे आपल्याकडील मराठी समाज प्रबोधनाचे जन कठरतात तसेच दादोबाच्या धर्मविवेचन व जोतिबांचे 'सार्वजनीक सत्यधर्म' ह्या दोन ग्रंथामध्ये आपल्याला, साम्यस्थळे दिसतात.

महात्मा ज्योतीराव फुले यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाच्या वाटचालीला स्वावलंबी विचार व स्वतंत्र लढाऊ कार्यक्रम दिला म्हणून महात्मा ज्योतिबा फुले हे भारताच्या सामाजिक इतिहासात दुसऱ्या 'पर्यायी संस्कृतीचे जनक' म्हणून ओळखले जातात त्यानी सामाजिक समता हा मानवी जीवनाचा केंद्र बिंदू मानला. समता धिष्टीत समाजरचना या ध्येयानुसार त्यांनी कार्य केले, तसेच 'बुद्धीवाद व मानवता' हा त्याच्या विचाराचा कणा होता. भारतीय समाज व्यवस्थेमधील गुलामगिरीचे विदारक चित्र आपल्याला तर्कतीर्थ लक्ष्मण शाही जोशी यांच्या 'हिंदू धर्मांची मीमांसा' नामक ग्रंथांतून पहावयास मिळते.

आपल्या समाजाचा स्वभाव सामान्यतः परंपरावादी आहे. परंपरेतून परिवर्तन करावयाचे झाल्यास परंपरेविरुद्ध बंड उभारावे लागते. महाराष्ट्राच्या प्रतिक्रिया प्रधान बंडाचे स्वरूप धार्मिक व सामाजिक होते. महात्मा फुले यांच्यावर थॉमसपेनच्या 'एज ऑफरिझन' ग्रंथाचे वाचन केले होते. २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात आली. धर्म, कर्म, व्यवहार, यात शुद्र नाडले जाऊ नयेत म्हणून सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

सत्यशोधक समाजाने निर्मिकाचे आस्तित्व, मानवी अधिकारांची जपवणूक, व्यसनमुक्ती, स्त्रीशिक्षण, समाज उन्नतीसाठी आर्थिक मदत, लोकशाही पद्धतीचा, अवलंब यासारख्या घटकांचा अंगिकार केला. त्याचबरोबर विद्याप्रसार, शेतीविषयक सुधारणा तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची सोय व्हावी म्हणून कृष्णराव भालेकर यांनी सुशिक्षण गृह काढले. कालांतराने सत्यशोधक समाजाचे चळवळीत रुपांतर झाले. सत्यशोधक समाजनिर्मिक, एक धर्म व एक मनुष्य जात मानणारा होता. अवतारणवाद, विभूतीपूजा व मूर्ती पूजा त्याना अमान्य होती.

Scanned with CamScanner

 ISBN : 978-93-85218-02-6

कालांतराने सत्यशोधक समाजाला राजकीय स्वरूप प्राप्त झाले. सत्यशोधक समाजातूनच ब्राह्मणेतर राजकीय पक्षाचे नवेस्वरूप मुंबई, मध्यप्रांत वऱ्हाड व मद्रास या इलाख्यातून येऊ लागले. ब्राह्मणेतर पक्षाचे नेतृत्व शाहू महाराजांनी केले. ब्राह्मणेतर पक्षामुळे सत्यशोधक समाजाचे मूळस्वरूप नाहीसे झाले. तसेच तात्वीक वाढ खुंटली. थोडक्यात काय तर सत्तावाद बळावल्यामुळे जोतीरावांचा व्यापक ध्येयवाद उपेक्षित राहिला.

भारतातील सामाजिक प्रबोधनाची मांडणी करताना आपल्या दोन टप्प्यात या कालखंडाची विभागणी करता येते पहिला टप्पा स्वातंत्र्योत्तर काळातील समाजप्रबोधन हे होय. स्वातंत्र्य पूर्वकाळातील समाजप्रबोधनाला काळाच्या मर्यादा पडल्या. या कालखंडातील समाजप्रबोधन हे राज्य, संस्कृती, साहित्य व धर्म यांच्याशी संबंधीत होते. या घटकांआधारित तत्कालीन समाजप्रबोधनाची कार्यप्रणाली दिसते. राष्ट्र, धर्म यादृष्ट्रीकोणातूनच सामाजिक संस्था व संघटना यांचा उगम झाल्याचे आपणास दिसते. सामान्य व्यक्तीला समाजात समान वागणूक मिळावी यासाठी सत्यशोधक समाजाने कार्य केले. तसेच याकालखंडात भेदाभेद, अस्पृश्यता, शिक्षण, यासारख्या प्रश्नाना केंद्रस्थानी मानून सामाजिक सुधारणा राबविण्यात आल्या कोणतेही सामाजिक प्रबोधन संपूर्णतः यशस्वीकिंवापूर्णतः अयशस्वीझालेअसेम्हणता येतनाहीकारणकालानुरूपपरिवर्तनहानिसर्गआहे व बदलेल्या काळानुसार संदर्भ बदलतात व या संदर्भानुसारच परिवर्तने होतात. त्यामुळे प्रबोधनातूनच परिवर्तने होतात.

स्वातंत्र्यपूर्वकाळातील सामाजिक प्रबोधन ही स्वातंत्र्योत्तर काळातील नवसमाज प्रबोधनाची प्रेरणा ठरते. आजच्या नव्या सामाजिक गरजातून नवसमाज प्रबोधन होणे निकडीचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील बदलेल्या व्यवस्थेनुसार आता समाजसुधारणा म्हणजे आता आर्थिक दृष्टयादुर्बल घटकांना सक्षमकरणे अशी नवी व्याख्या करणे क्रमप्राप्त ठरते. या कालखंडात अर्थप्रधान ताहामानवी समाजाचा केंद्रबिंदू आहे. भारतातील नवसमाज प्रबोधनासाठी नवधर्म/नवपंथ संस्थापना करण्याची गरज नाही कारण नवपंथातून त्याची नवीजात निर्माण होते.

नवसमाजप्रबोधनाची मांडणी करत असताना धर्मनिरपेक्ष सामाजिक दृष्टीविकसित करणे गरजेचे आहे. आजच्या बदललेल्या सामाजिक प्रश्नानुसार नवसमाजप्रबोधन होणे निकडीचे आहे आज आपल्यासमोर दहशतवाद, भ्रष्टाचार, स्त्री-सुरक्षा, सामाजिकसलोखा यासारखेप्रश्नउभेआहेत व या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपल्याला नवसमाज प्रबोधनाची गरजआहे. शिक्षणातून राष्ट्रीय एकात्मता व भावनिक ऐक्य निर्माण करण्याची गरज आहे. तसेच लोकशाही व्यवस्थेतून मिळालेल्या हक्क व कर्तव्याची पुन्हा एकदा चिकित्सा करणे गरजेचे आहे.

निधर्मी दृष्टीचा 'सर्वधर्म समभाव' म्हणजे जातीधर्म संप्रदायातील दृष्टी असाही होतो, व तोही रचनात्मक एकात्मतेला आणि भावनिक ऐक्याला पूरक ठरतो. प्रबोधनाचा अविष्कार कालपरत्वे व जरुरी प्रमाणे विचारवंताच्या ठायी होऊ शकतो विचारवंत जरसमाजचिंतक असतील तर प्रबोधनाला समाजप्रबोधनाचे स्वरूप येते. साहित्य ही प्रबोधनाची जननी ठरते.

थोडक्यात महाराष्ट्राच्या संताच्या चळवळीत समाजप्रबोधनाची बीजे होती. अध्यात्मीक व पारमार्थिक समतेचा विचार हा सामाजिक समतेला प्रेरणा देतो. समाजप्रबोधन हे मुख्यत्वेकिया व प्रतिक्रिया यामधून प्रवाहीत होत असते. महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनातून मानवमुक्तीची सांस्कृतिक आघाडी असे दलित साहित्याचे स्थानआहे. महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधन परखडचिकित्सेतून विकसित झाले आहे. प्रबोधनातूनच परिवर्तनाला सुरुवात होत असते. नवसमाजप्रबोधन हे चिंतनशील असावे. सामाजिक समता, न्याय, यासारख्या घटकांच्या स्थापने बरोबरच प्रचलीत प्रश्नांची सोडवणूक होणे निकडीचे आहे.

संदर्भग्रंथ :

१. व्होरा राजेंद्र, 'आधुनिकता व परंपरा एकोणिसाव्या शतकांतील महाराष्ट्र' प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती-२०००

२. पाटील व्ही. वी., 'एकोणिसाव्या शतकांतील समाजसुधारणाचा इतिहास' सागर प्रकाशन, पुणे-२००४

३. कुंभार नागोराय (संपा.) 'सामाजिक चळवळ काल, आज व उदया' डिसेंबर १९९४

४. चव्हाण रा. ना. रमेश चव्हाण (संपा.), 'महात्मा फुले यांचा शोध व बोध' २००५

५. चव्हाण रा. ना. रमेश चव्हाण (संपा.), 'सकल जनसंवाद', २०१५

६. जोशी महेश, 'सत्यशोधक समाजाचा इतिहास' : प्रस्तावना खंड, २००२.

***

"*Propagation of Education for Knowledge Science and Values.*" - *Dr. Bapuji Salunkhe.*





Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# Samajbhushan Ganpatrao Kalbhor Arts, Commerce & Science College, Lonikalbhor, Pune

& *BCUD, Savitribai Phule Pune University, Pune*

Organized

State Level Seminar

on

**"19th & 20th Century Social Reform Movements in Maharashtra"**

**27th & 28th January, 2017.**

# Certificate

This is to certify that Dr./Mr./Mrs. Bhalsing Ajit Laxman participated as a Resource Person / Chairperson / Presented a paper on महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनात सत्यशोधक समाजाची भूमिका at the State Level Seminar on "19th & 20th Century Social Reform Movements in Maharashtra" organized by SAMAJBHUSHAN GANPATRAO KALBHOR COLLEGE, Loni Kalbhor on 27th & 28th January 2017.

Dr. Ambadas Manjulkar
*(CO-ORDINATOR)*

Dr. Sunilkumar Kurane
*(PRINCIPAL)*

Scanned with CamScanner